दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरल्यास थेट कारवाई

पुणे : पुणे शहरात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकाम व्यावसायिकांनी (बिल्डरांनी) बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये, असा कडक इशारा पुणे महानगरपालिकेने दिला आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास थेट कोणतीही पूर्वसूचना न देता 'काम बंद' करण्याची नोटीस दिली जाईल आणि कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी स्पष्ट केले आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २८ जून २०२६ | वर्ष - १ | अंक - २७३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### अयोध्येतील राम मंदिराच्या देणगीवर डल्ला, ८ जण अटकेत; मिळालेल्या दानातील नोटांची बंडले लपवायचे बाथरूममध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या :** अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणगीच्या अपहार प्रकरणात आठ जणांना अटक करण्यात आली असून, त्यांना २९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासादरम्यान आतापर्यंत ७९.८५ लाख रुपये जप्त करण्यात आल्याची माहिती सरकारी पक्षाने न्यायालयात दिली.


पोलिसांनी अद्याप आरोपींच्या पोलीस कोठडीची मागणी केलेली नसून, सोमवारी त्यांना पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. त्यावेळी पोलिसांकडून पोलीस कोठडीची मागणी केली जाऊ शकते. या प्रकरणात श्री राम जन्मभूमी तीर्थ ट्रस्टचे महासचिव चंपत राय व विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिल्याचे बोलले जाते. अटकेतील पाच ते सहा जण बँक कर्मचारी आहेत. ते मंदिरातील दान रक्कम मोजण्याच्या कामावर नियुक्त होते. मंदिरातल्या बाथरूममध्ये नोटांची बंडले लपवून नंतर ते गायब करायचे. देवरिया येथील कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले की, विशेष तपास पथकाचा अहवाल मिळाल्यानंतर तातडीने पोलिसांनी कारवाई केली. सत्य आणि असत्य यातील फरक स्पष्ट केला जाईल. जनतेच्या श्रद्धेशी खेळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी म्हटले.

# पेपरफुटीनंतर विद्यार्थ्यांमध्ये सरकारी परीक्षा व्यवस्थेबाबत अविश्वासाची भावना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीच्या संशयामुळे परीक्षेच्या अवघ्या एक दिवस आधी पुढे ढकलण्यात आल्याने राज्यातील लाखो उमेदवारांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेमुळे केवळ परीक्षा लांबणीवर पडली नाही, तर सरकारी परीक्षा व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर आणि विश्वासार्हतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परीक्षेची तयारी करण्यासाठी अनेक महिने परिश्रम घेतलेल्या उमेदवारांमध्ये संताप, निराशा आणि असुरक्षिततेची भावना व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी परिसरात पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात प्रश्नपत्रिकेशी साधर्म्य असलेले साहित्य आढळून आले. त्यानंतर तिघांना अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षा प्रक्रियेची निष्पक्षता अबाधित ठेवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजित टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. नव्या तारखेची घोषणा लवकरच केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



दरम्यान, या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो उमेदवारांच्या नियोजनावर परिणाम झाला आहे. अनेकांनी प्रवास, निवास आणि इतर तयारीसाठी खर्च केला होता. परीक्षा अचानक पुढे ढकलल्याने त्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच, शिवाय मानसिक ताणही वाढला आहे. विशेषतः शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांमध्ये परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा आणि भरती परीक्षांमध्ये पेपरफुटी किंवा गैरप्रकारांच्या आरोपांमुळे उमेदवारांचा सरकारी यंत्रणेवरील विश्वास कमी होत असल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. मेहनतीने अभ्यास करणाऱ्या उमेदवारांवर अशा घटनांचा सर्वाधिक परिणाम होत असून, प्रामाणिकपणे तयारी करणाऱ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याची नाराजी उमेदवारांकडून व्यक्त होत आहे.

शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक तांत्रिक सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे सुरक्षित वितरण, जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर उत्तरदायित्व आणि दोषींवर तातडीने कडक कारवाई झाल्यासच विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित होऊ शकतो.

सरकारने या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून दोषींना कठोर शिक्षा देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी विविध विद्यार्थी संघटना आणि उमेदवारांकडून करण्यात येत आहे.

## थोडी जरी लाज उरली असेल तर तत्काळ यावर कायमचा बंदोबस्त करावा : विजय वडेट्टीवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात चाललंय काय? टीईटी पेपर ठाण्यात फुटतो आणि नीट पेपरफुटीचे धागेदोरे थेट आपल्या राज्यात सापडतात. परीक्षा कोणतीही असो, पेपर फुटणारच ही या सरकारची ओळख बनली आहे. दिवस-रात्र एक करून अभ्यास करणाऱ्या कष्टकरी परीक्षार्थींच्या भविष्याचा हा उघडउघड खून आहे.

या लाचार सरकारला एक परीक्षा देखील सुरक्षितपणे घेता येत नाही, हेच यातून सिद्ध होतंय. सत्ताधाऱ्यांना केवळ स्वतःच्या खुर्च्या टिकवण्यात रस आहे; महाराष्ट्रातील लाखो परीक्षार्थी आणि त्यांच्या पालकांच्या वेदनेशी यांना काहीही देणंघेणं नाही. हे सरकारचे ढळढळीत अपयश आहे, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. 'जर सरकारला थोडी जरी लाज उरली असेल, तर त्यांनी तात्काळ यावर कायमचा बंदोबस्त करावा. परीक्षार्थींच्या कष्टाचा बाजार मांडणाऱ्या या राज्यकर्त्यांना सत्तेवर बसण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना जनता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.', असा इशारा देखील त्यांनी दिला. ही केवळ पेपरफुटी नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची, त्यांच्या कष्टांची आणि त्यांच्या भविष्याची चोरी आहे.सरकारी भरती परीक्षा असो किंवा पात्रता परीक्षा, वारंवार पेपरफुटी होत असताना सरकार मात्र नेहमीप्रमाणे चौकशीच्या घोषणा करण्यातच व्यस्त असते. दरवेळी दोषींवर कारवाई करू असे सांगितले जाते, पण पुढचा पेपर पुन्हा फुटतो. याचा अर्थ दोषींना कायद्याचा धाक राहिलेला नाही किंवा त्यांना कुणाचे तरी संरक्षण मिळत आहे, असे देखील वडेट्टीवार म्हणाले.

आज महाराष्ट्रातील युवक बेरोजगारीच्या संकटाशी झुंज देत आहेत. महायुती सरकारने या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. हा पेपर नेमका कसा फुटला? त्यामागे कोणते रॅकेट कार्यरत आहे? त्याला राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण आहे का? याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. केवळ लहान-मोठ्या दलालांना अटक करून चालणार नाही, तर या रॅकेटमधील सूत्रधार आणि त्यांना संरक्षण देणाऱ्यांनाही कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे मागणी देखील वडेट्टीवार यांनी केली.

## सरसकट कर्जमाफी मिळाली नाही तर जेलभरो आंदोलन; रोहित पवारांचा सरकारला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यामध्ये घालण्यात आलेल्या विविध अटींमुळे सुमारे ८० टक्के शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे सरसकट कर्जमाफीचा निर्णय न घेतल्यास येत्या काळात जेलभरो आंदोलन छेडले जाईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे नेते रोहित पवार यांनी दिला.

बीड येथील राष्ट्रवादी भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी संदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आमदार सय्यद सलीम, मोहनराव जगताप, तांदळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

रोहित पवार म्हणाले की, ३६ लाख शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री गिरीष महाजन यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून अधिवेशनापूर्वी



बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ती बैठक झाली नाही. त्यामुळे आता २९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथील केंब्रिज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून, त्यानंतरही सरकारने निर्णय घेतला नाही तर जेलभरो आंदोलन करण्यात येईल. यावेळी त्यांनी बीड जिल्ह्यातील पीकविमा प्रश्नावरही सरकारवर टीका केली. २०२० आणि २०२५ या दोन्ही वर्षांत शेतकऱ्यांना अपेक्षित पीकविमा मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी केला. विमा कंपन्या मोठा नफा कमावत असताना शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची नुकसानभरपाई मिळत नसल्याचे ते म्हणाले. २०२० मध्ये बीड जिल्ह्याला सुमारे ८५० कोटी रुपयांचा विमा मिळणे अपेक्षित होते, तर २०२५ मधील अतिवृष्टीनंतरही नुकसानभरपाई मिळाली नसल्याचा दावा त्यांनी केला. सरकारने २०२५ मध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर केली होती. मात्र प्रत्यक्षात अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहिल्याचा आरोपही त्यांनी केला. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही अधिक आर्थिक मदत मिळावी, तसेच कर्जमाफी झाल्यानंतर पुन्हा कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

## कासरगोडमध्ये मानवतेचे उदाहरण: मुस्लिम महिला पंचायत सदस्यांनी हिंदू व्यक्तींचे अंत्यसंस्कार केले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कासरगोड (केरळ) :** केरळच्या कासरगोड जिल्ह्यात एका मुस्लिम महिला पंचायत सदस्याने हिंदू व्यक्तीचे अंतिम संस्कार हिंदू परंपरेनुसार करून मानवतेचे उदाहरण घालून दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ६४ वर्षीय नारायणन हे कर्करोगाने ग्रस्त होते आणि अत्यवस्थ अवस्थेत होते. उपचारादरम्यान त्यांच्या कुटुंबाने त्यांना स्वीकारण्यास नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या निधनानंतर स्थानिक पोलिसांच्या परवानगीने पंचायत सदस्य इर्फाना इक्बाल यांनी मृतदेह ताब्यात घेतला. त्यांनी सर्व अंत्यसंस्कार हिंदू धार्मिक रीतीरिवाजांनुसार पार पाडले.

याआधीही इर्फाना यांनी नारायणन यांच्या उपचारासाठी आणि देखभालीसाठी मदत केल्याचे सांगितले जाते. त्यांच्या या कृतीचे स्थानिक पातळीवर आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

ही घटना धर्म, जात यापलीकडे जाऊन माणुसकी जपण्याचे उदाहरण म्हणून पाहिली जात आहे.

## आमदार राजेश क्षीरसागर यांच्यावर ४० लाखांच्या कथित कमिशनचा आरोप; स्टिंग ऑपरेशनचा व्हिडिओ व्हायरल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कासरगोड (केरळ) :** महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष तथा आमदार राजेश क्षीरसागर यांचा एक कथित स्टिंग ऑपरेशनचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यातून ४० लाख रुपयांच्या कथित कमिशनचा आरोप करण्यात आला आहे.

व्हायरल व्हिडिओमध्ये ठेकेदाराच्या बिलातून टक्केवारी आणि साहेबांचे ५ टक्के अशा स्वरूपाचे संभाषण ऐकू येत



असल्याचा दावा करण्यात आला आहे. संबंधित ठेकेदाराने ७ टक्के कमिशनच्या करारानुसार आमदार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ४० लाख रुपये दिल्याचा आरोप केला आहे. हा व्हिडिओ कोल्हापूरमधील रविकिरण इंगवले यांनी पत्रकार परिषदेत सादर केला. त्यांनी या प्रकरणाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच पोलीस महानिरीक्षकांकडे दाखल करण्याची घोषणा केली आहे. यासोबतच राजेश क्षीरसागर यांच्या राजीनाम्याची आणि आमदारपद रद्द करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी अथवा पुष्टी झालेली नाही. संबंधित आरोपांवर आमदार राजेश क्षीरसागर यांची भूमिका किंवा प्रतिक्रिया समोर आल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

## भरसभेत उद्धव ठाकरेंनी संजय देशमुखांची 'ती' क्लीप ऐकवली, आईचं स्वप्न...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा खासदार फुटले. या खासदारांच्या विरोधात उद्धव ठाकरे हे मैदानात उतरले आहेत. खासदार संजय देशमुख यांचा मतदारसंघ वाशिम-यवमाळच्या दौऱ्यावर ठाकरे आहेत. या दौऱ्यात त्यांनी देशमुखांवर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, 'काही वेळेला माझी चूक होते आणि म्हणून पहिल्या प्रथम माझं कर्तव्य आहे की माझ्या सांगण्यावरून जे तुम्हाला मी एक बुजगावणं दिलं होतं, त्याला अक्षरशः रक्ताचं पाणी करून समोरून पावसाचा धबधबा पडत होता, तरी देखील कशाची तमा न बाळकता तुम्ही निवडून दिलात. त्याच्याबद्दल मी तुमच्या सगळ्यांची तर माफी मागतोच, पण तमाम या यवतमाळ आणि वाशिम लोकसभा मतदारसंघातील मतदारांची माफी मागतो की तुम्ही केवळ आणि केवळ शिवसेना प्रमुखांचा चेहरा आणि माझा शब्द या भरोशावरती या गद्दाराला निवडून दिला होता.'

## 'जनरेशन झेड' म्हणजे नेमकं कोण? दिल्लीच्या झोपडपट्टीतील किशोरही Gen Z आहे का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** 'जनरेशन झेड' (Gen Z) हा शब्द आजच्या काळात मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. साधारणपणे १९९७ ते २०१२ या कालावधीत जन्मलेल्या तरुणांना या पिढीचा भाग मानले जाते. सोशल मीडिया, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऑनलाइन शिक्षण आणि डिजिटल जगाशी सहज जुळवून घेणारी ही पिढी अशी तिची ओळख निर्माण झाली आहे. मात्र भारतासारख्या सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक विविधता असलेल्या देशात केवळ जन्मवर्षाच्या आधारावर संपूर्ण पिढीचे एकसारखे चित्र उभे करता येईल का, हा प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

एका ताज्या विश्लेषणातून याच मुद्द्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. लेखात असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे की, दक्षिण दिल्लीतील आलिशान घरात राहणारा, महागड्या स्मार्टफोनवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणारा आणि परदेशी शिक्षणाचे स्वप्न पाहणारा तरुण आणि दिल्लीच्या झोपडपट्टीत राहणारा, कुटुंबाला हातभार लावण्यासाठी लहान वयातच काम करणारा किशोर – हे दोघेही वयानुसार 'Gen Z' आहेत. मात्र त्यांच्या आयुष्याचे वास्तव, संधी आणि आव्हाने पूर्णपणे वेगळी आहेत.

भारतातील तरुणांचा अनुभव हा केवळ वयानुसार ठरत नाही. तो त्यांच्या आर्थिक स्थिती, शिक्षणाची उपलब्धता, राहणीमान, ग्रामीण-शहरी पार्श्वभूमी, इंटरनेट सुविधा, कुटुंबाचे उत्पन्न आणि सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतो. त्यामुळे 'Gen Z' हा शब्द वापरताना भारतातील विषमता लक्षात घेणे आवश्यक असल्याचे या विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे.

आज महानगरांतील अनेक तरुण कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल कंटेंट, स्टार्टअप, ऑनलाइन व्यवसाय आणि जागतिक रोजगाराच्या संधींचा लाभ घेत आहेत. दुसरीकडे देशातील लाखो तरुण अजूनही दर्जेदार शाळा, उच्च शिक्षण, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि रोजगाराच्या मूलभूत संधींसाठी संघर्ष करत आहेत. अनेक विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन शिक्षणासाठी स्वतंत्र मोबाइल फोन किंवा संगणकही उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत दोघांनाही समान अनुभव असलेली 'डिजिटल पिढी' म्हणणे वास्तवाशी सुसंगत ठरत नाही.

कोविड-१९ महामारीच्या काळात ही दरी अधिक स्पष्ट झाली. शहरी भागातील विद्यार्थ्यांनी ऑनलाइन वर्ग, डिजिटल परीक्षा आणि ई-लर्निंगचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. मात्र ग्रामीण भागात आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील अनेक विद्यार्थ्यांना इटरनेट, स्मार्टफोन किंवा विजेच्या समस्यांमुळे शिक्षणापासून दूर राहावे लागले. त्यामुळे एकाच वयोगटातील विद्यार्थ्यांमध्येही मोठी शैक्षणिक दरी निर्माण झाली.

सोशल मीडियावर 'Gen Z'ची प्रतिमा अनेकदा फॅशन, लाइफस्टाइल, इन्फ्लुएन्सर संस्कृती, रील्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल करिअर आणि जागतिक ट्रेंड यांच्याशी जोडली जाते. मात्र ही प्रतिमा सर्व भारतीय तरुणांचे प्रतिनिधित्व करत नाही. देशातील मोठा युवक वर्ग अजूनही शेती, मजुरी, लघुउद्योग, असंघटित क्षेत्र किंवा कौटुंबिक व्यवसायावर अवलंबून आहे. त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील प्राधान्यक्रम हे रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक स्थैर्याशी अधिक संबंधित आहेत.

तज्ज्ञांच्या मते, धोरणे आखताना तरुणांना केवळ जन्मवर्षाच्या आधारे एकसमान गट म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. शिक्षण, डिजिटल सुविधा, सामाजिक पार्श्वभूमी, आर्थिक स्थिती आणि प्रादेशिक विषमता यांचा विचार करूनच युवकांसाठी प्रभावी योजना तयार कराव्या लागतील. अन्यथा संधींची दरी आणखी वाढू शकते.

भारतातील डिजिटल क्रांतीने अनेक नवीन संधी उपलब्ध करून दिल्या असल्या, तरी त्या सर्वांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेल्या नाहीत. शहरातील तरुण आणि ग्रामीण भागातील तरुण यांच्यातील डिजिटल दरी आजही मोठी आहे. इंटरनेटची उपलब्धता, इंग्रजी भाषेचे ज्ञान, तांत्रिक कौशल्ये आणि आर्थिक क्षमता या सर्व बाबी तरुणांच्या भवितव्यावर परिणाम करत आहेत.

यामुळे 'Gen Z' ही केवळ वयाची ओळख नसून, प्रत्येक तरुणाचे वास्तव समजून घेण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक संदर्भही महत्त्वाचे आहेत, हा संदेश या विश्लेषणातून समोर येतो. भारतात एकाच पिढीतील दोन तरुणांचे आयुष्य परस्परांपेक्षा पूर्णपणे भिन्न असू शकते. त्यामुळे युवकांबाबत चर्चा करताना त्यांची सामाजिक पार्श्वभूमी, उपलब्ध संधी आणि जीवनातील वास्तव यांचा विचार करणे अधिक आवश्यक असल्याचे या लेखातून अधोरेखित करण्यात आले आहे.

आजच्या भारतात 'Gen Z'ची व्याख्या केवळ जन्मवर्षाने होत नाही, तर संधी, साधने, शिक्षण आणि सामाजिक परिस्थिती यांच्या संगमातून ती घडते. म्हणूनच, दिल्लीच्या झोपडपट्टीतील किशोर आणि महानगरातील संपन्न कुटुंबातील तरुण दोघेही वयानुसार 'Gen Z' असले, तरी त्यांचे जगण्याचे अनुभव, स्वप्ने आणि संघर्ष एकसारखे नाहीत. हीच भारतीय समाजाची वास्तववादी ओळख असून, युवकांबाबतचे धोरणात्मक निर्णय घेताना याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे या चर्चेतून अधोरेखित झाले आहे.

## संपादकीय

### TET पेपरफुटी: केवळ घटना नव्हे, तर व्यवस्थेच्या अपयशाचे प्रतिबिंब

महाराष्ट्रातील शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२६ पुन्हा एकदा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयामुळे पुढे ढकलली गेली आणि आदल्या दिवशीच तीन जणांना अटक झाली, ही घटना केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. ही संपूर्ण परीक्षा प्रशासनाच्या संरचनेतील गंभीर त्रुटी, जबाबदारीतील ढिलाई आणि विश्वासाच्या ढासळत्या पायाभूत व्यवस्थेचे स्पष्ट लक्षण आहे. गेल्या काही वर्षांत परीक्षा प्रक्रियांच्या विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. NEET सारख्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांतील वाद अजूनही पूर्णपणे शांत झालेले नाहीत, आणि त्याच पार्श्वभूमीवर राज्यातील TET परीक्षेत पुन्हा संशय निर्माण होणे ही साधी योगायोगाची घटना मानता येत नाही. हे एक असे व्यवस्थात्मक अपयश आहे जे वारंवार स्वतःची पुनरावृत्ती करत आहे, पण त्यावर ठोस उपाययोजना दिसत नाही.

TET परीक्षा ही केवळ नोकरी मिळवण्याची प्रक्रिया नाही, तर भविष्यातील शिक्षक निवडण्याची निर्णायक यंत्रणा आहे. त्यामुळे या परीक्षेची पवित्रता अधिक महत्त्वाची ठरते. परंतु जेव्हा अशा परीक्षाच संशयाच्या भोवऱ्यात अडकतात, तेव्हा त्याचा परिणाम केवळ उमेदवारांवर मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण शिक्षणव्यवस्थेच्या नैतिक पायावर आघात करतो. शिक्षक घडविणाऱ्या प्रक्रियेतच जर अनियमितता असेल, तर पुढील पिढीच्या शिक्षणावर त्याचे दूरगामी परिणाम अपरिहार्य ठरतात.

या घटनांचा सर्वात चिंताजनक पैलू म्हणजे त्यांची पुनरावृत्ती. एकदा अपवाद म्हणून पाहिली जाणारी घटना आता पॅटर्न बनत चालली आहे. प्रत्येक मोठ्या परीक्षेनंतर चौकशी, अटक, तपास समित्या आणि तात्पुरती स्थगिती हेच चक्र सुरू राहते. परंतु या प्रक्रियेत मूळ प्रश्न कायम राहतो पेपर लीक नेमका होतो कसा? आणि तो रोखण्यात यंत्रणा का अपयशी ठरते?

परीक्षा व्यवस्थेतील तांत्रिक प्रगती असूनही ही असुरक्षितता का टिकून आहे, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. डिजिटल सुरक्षा, कडक नियमावली आणि नियंत्रित वितरण व्यवस्था असूनही जर प्रश्नपत्रिका बाहेर जात असेल, तर समस्या केवळ तंत्रज्ञानात नाही, तर मानवी साखळीतील गळतीत आहे. छपाईपासून वितरणापर्यंत आणि स्थानिक स्तरावरील हाताळणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर जबाबदारीची स्पष्टता असणे आवश्यक असते, परंतु प्रत्यक्षात ही साखळी अत्यंत कमजोर दिसते.

याचबरोबर एक आणखी गंभीर बाब म्हणजे उत्तरदायित्वाचा अभाव. अशा घटनांनंतर तातडीने कारवाई होते, अटकाही होतात, पण दीर्घकालीन जबाबदारी निश्चित केली जात नाही. कोणत्या स्तरावर सुरक्षा भंग झाली, कोणत्या यंत्रणेने दुर्लक्ष केले, आणि भविष्यात अशी घटना टाळण्यासाठी कोणते संरचनात्मक बदल केले गेले, याची पारदर्शक माहिती फारच क्वचित समोर येते. परिणामी, प्रत्येक नवीन प्रकरण जुन्या प्रकरणाचीच पुनरावृत्ती ठरते.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या घटना अत्यंत अन्यायकारक आहेत. वर्षानुवर्षे केलेली मेहनत, आर्थिक गुंतवणूक आणि मानसिक ताण यानंतर अचानक परीक्षा पुढे ढकलली जाणे किंवा रद्द होणे हे केवळ निराशाजनक नाही, तर व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारे आहे. परीक्षेच्या तयारीवर आधारित संपूर्ण भविष्य एका अनिश्चिततेत ढकलले जाते, आणि या अनिश्चिततेला जबाबदार कोण, याचे ठोस उत्तर कुठेच मिळत नाही.

शासनाने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय तातडीच्या परिस्थितीत घेतलेला असू शकतो, परंतु तो उपाय नाही. तो फक्त परिणाम नियंत्रित करण्याचा प्रयत्न आहे, मूळ कारणावर उपाय नाही. जर परीक्षा प्रणालीतील गळती थांबवायची असेल, तर संपूर्ण साखळीचे स्वतंत्र आणि कठोर ऑडिट, तंत्रज्ञानाबरोबरच मानवी घटकांवर नियंत्रण, आणि जबाबदारी निश्चित करणारी कठोर चौकट आवश्यक आहे.

आजची परिस्थिती ही इशारा आहे. परीक्षा व्यवस्था जर वारंवार संशयाच्या छायेत अडकत असेल, तर ती सुधारण्यापेक्षा पुनर्रचनेची मागणी करते. अन्यथा, प्रत्येक नवीन परीक्षा ही जुन्या चुका पुन्हा उजागर करणारी ठरेल, आणि विश्वास हा शब्द केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहील.

# संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे ७ जुलैला पंढरपूरकडे प्रस्थान, ३४१व्या वारीचे वेळापत्रक जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** श्रीक्षेत्र देहू येथील श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने यंदाच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे वेळापत्रक बुधवारी जाहीर करण्यात आले. येत्या ७ जुलैला पालखी सोहळा मुख्य देऊळवाड्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. संस्थानकडून यंदा विश्वस्त विक्रमसिंह उमराज मोरे–देहूकर, उमेश सुरेश मोरे आणि लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांच्यावर पालखी सोहळा प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या तिघांच्या नेतृत्वाखाली यंदाचा पालखी सोहळा पार पडणार आहे.

यंदा ७ जुलै रोजी आषाढ पौर्णिमेला पालखीचे श्रीक्षेत्र देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून १७ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी पालखी पंढरपुरातील श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात दाखल होणार आहे. २९ जुलैला पालखीचा परतीचा प्रवास सुरू होणार असून ९ ऑगस्टला एकादशीच्या दिवशी पालखीचे श्रीक्षेत्र देहू येथे आगमन होणार आहे. गतवर्षीच्या सोहळ्यात ३९५ दिंड्यांचा सहभाग होता.

पालखी रथापुढे ३० आणि रथामागे उर्वरित दिंड्या सहभागी झाल्या होत्या.

वारकरी संप्रदायातील या पालखी सोहळ्यास साडेतीनशे वर्षांची परंपरा आहे. संत तुकाराम महाराजांचे तृतीय चिरंजीव




तपोनिधी नारायण महाराज यांनी १६८५ मध्ये या सोहळ्याची मुहूर्तमेढ रोवली. प्रारंभी ते देहूहून तुकोबांच्या पादुका पालखीत घेऊन आळंदीला जात असत. तेथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांसह हा सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ होत असे. पुढे १८३२ पासून संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखी सोहळे स्वतंत्रपणे पंढरपूरकडे प्रस्थान करू लागले. दिंड्यांची संख्या आणि वारकऱ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत गेला. गतवर्षीच्या सोहळ्यात ३९५ दिंड्यांचा सहभाग होता. पालखी रथापुढे ३० आणि रथामागे उर्वरित दिंड्या सहभागी झाल्या होत्या.

**संस्थान चौघडा गाडीसाठी तीन बैलजोड्या विकत घेणार**

यंदाच्या सोहळ्यासाठी संस्थानतर्फे चौघडा गाडीसाठी तीन बैलजोड्यांची खरेदी करण्यात येणार असून, नवीन चांदीचा पालखी रथ तयार करण्याचे कामही सुरू आहे. हा रथ प्रस्थानापूर्वी पूर्ण करण्याचा मानस असून, भाविकांनी चांदी अथवा आर्थिक स्वरूपात देणगी देऊन या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

## पुणे–पंढरपूर सायकल वारीत विक्रमी सहभाग; २३५० सायकलस्वारांनी पूर्ण केला २३५ किमीचा प्रवास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** इंडो अ‍ॅथलेटिक्स सोसायटीतर्फे आयोजित १० वी पुणे–पंढरपूर सायकल वारी उत्साहात पार पडली. या उपक्रमात यंदा विक्रमी २३५० सायकलस्वारांनी सहभाग घेत २३५ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला.

देहू येथील गाथा मंदिरातून पहाटे सुरू झालेली ही वारी भक्तिमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाली. देशभरातून आलेल्या सायकलप्रेमींनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

या वारीत सुमारे ३०० महिला आणि १०० हून अधिक बालसायकलस्वार सहभागी झाले. कोविड



काळातही न थांबता सुरू राहिलेल्या या उपक्रमाने मागील सर्व वर्षांचे विक्रम मोडत भारतातील सर्वात मोठी सायकल वारी म्हणून नवा टप्पा गाठला आहे. २०१६ मध्ये अवघ्या ७ सायकलस्वारांपासून सुरू झालेला हा उपक्रम आता हजारोंच्या सहभागापर्यंत पोहोचला असून, दरवर्षी सहभागात सातत्याने वाढ होत असल्याचे आयोजकांनी सांगितले. देहू–पंढरपूर या मार्गावर ही वारी पार पडली असून, सायकलिंग, आरोग्य, पर्यावरण आणि वारकरी परंपरेचा संगम साधणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## 'गॅसचे बिल अपडेट करा, नाहीतर कनेक्शन कट होईल'; काळेवाडीत ज्येष्ठ नागरिकाला ऑनलाईन गॅस बिलाच्या नावाखाली लुटले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काळेवाडी :** 'तुमच्या गॅसचे कनेक्शन बिल थकले आहे, ते त्वरित अपडेट न केल्यास गॅस पुरवठा खंडित होईल' अशी भीती दाखवून काळेवाडीतील एका ८४ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे.

'एमआयजी' (महाराष्ट्र नॅचरल गॅस) च्या नावाने बनावट मेसेज फिर्यादी केशव लक्ष्मण असनारे (वय ८४, रा. शिवराज नगर, रहाटणी) यांना देवेश जोशी आणि अजय कुमार नावाच्या व्यक्तींनी मोबाईलवर मेसेज आणि कॉल केला. ''तुमच्या गॅसचे कनेक्शनचे बिल अपडेट करायचे आहे'' असे सांगून आरोपींनी फिर्यादीच्या व्हॉट्सअ‍ॅपवर एक बनावट लिंक पाठवली आणि ती डाउनलोड करण्यास भाग पाडले. बँक खात्यावर मारला डल्ला आरोपींनी मोबाईल स्क्रीनचा अ‍ॅक्सेस मिळवून आणि महाराष्ट्र नॅचरल गॅस (MNGL) चे अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवून फिर्यादीच्या बँक खात्यातून बेकायदेशीरपणे पैसे काढून घेतले. (स्क्रीनशॉटमध्ये पूर्ण रक्कम जाहिरातीमुळे कट झाली आहे). याप्रकरणी रहाटणी/काळेवाडी पोलिसांनी देवेश जोशी आणि अजय कुमार या दोन्ही संशयित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोनि राही पुढील तपास करत आहेत.

# 'जस्टीस फॉर केतन अग्रवाल' फलकांसह रहिवाशांचा कॅंडल मार्च; केतनच्या सोसायटीतील नागरिक न्यायासाठी एकवटले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** मावळ तालुक्यातील लोहगडावर केतन अग्रवाल याला ढकलून देऊन खून केल्याच्या प्रकरणाच्या निषेधार्थ गहुंजे येथील लोढा बेलमोंडो सोसायटीमध्ये शनिवारी (दि. २७) सायंकाळी शांततेत कॅन्डल मार्च काढण्यात आला. न्याय मिळावा, या एकाच मागणीसाठी सोसायटीतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

केतन अग्रवाल प्रकरणामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असताना रहिवाशांनी एकत्र येत शांततापूर्ण पद्धतीने आपली भूमिका मांडली. सायंकाळी सातच्या सुमारास आयोजित करण्यात आलेल्या या कॅन्डल मार्चमध्ये नागरिकांनी हातात मेणबत्त्या आणि 'जस्टीस फॉर केतन अग्रवाल', अन्यायाविरोधात ठाम पाऊल, न्यायासाठी अखंड लढा असे संदेश असलेले फलक घेतले होते. केतन अग्रवाल याच्या मृत्यू




प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. लोढा बेलमोंडो सोसायटी परिसरात काढण्यात आलेल्या या मूक कॅन्डल मार्चने न्यायासाठी नागरिक एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. शांत, संयमी आणि संघटित पद्धतीने करण्यात आलेल्या या आंदोलनातून न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवत नागरिकांनी आपली संवेदनशील भूमिका अधोरेखित केली.

## सांगवीत मॅट्रिमोनिअल साईटवरून महिलेला ५ लाखांचा गंडा!

### 'युके'वरून महागडे गिफ्ट पाठवल्याचे सांगून कस्टम ड्युटीच्या नावाखाली लुटले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सांगवी :** लग्नाचे आमिष दाखवून एका महिलेला तब्बल ५ लाख ३ हजार रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार नवी सांगवी भागात समोर आला आहे. इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपवरून ओळख वाढवून एका सायबर भामट्याने महिला फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली.

लग्नाचे आमिष आणि महागड्या गिफ्टचे नाटक मिळालेल्या माहितीनुसार, नवी सांगवी येथील रहिवासी असलेल्या सना तौशीफ शेख (वय ३०) यांनी इंस्टाग्रामवर 'लग्नासाठी मुलगी पाहिजे' अशी पोस्ट पाहिली होती. त्यावर क्लिक केल्यानंतर 'रेहान' नावाच्या आरोपीने त्यांच्याशी संपर्क साधला. आपण युके (UK) येथे राहत असल्याचे भासवून त्याने फिर्यादीशी जवळीक साधली आणि विश्वास संपादन केला. त्यानंतर 'मी तुझ्यासाठी मौल्यवान दागिने, डायमंड, कपडे, महागडे बूट आणि आयफोन पाठवला आहे' असे सांगून फिर्यादीला भूलथापा दिल्या.

DHL कूरियरच्या नावाने लुटले काही दिवसांनी 'डीएचएल कूरियर' (DHL Courier) चा कर्मचारी आशिष वर्मा बोलत असल्याचे सांगून दुसऱ्या आरोपीने फिर्यादीला फोन केला. 'तुमचे महागडे पार्सल आले असून ते सोडवण्यासाठी कस्टम ड्युटी भरावी लागेल' अशी भीती त्याने दाखवली. आरोपींच्या जाळ्यात फसलेल्या फिर्यादीने वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण ५,०३,००० रुपये ट्रान्सफर केले. एवढे पैसे उकळल्यानंतरही आरोपींनी पुन्हा इन्शुरन्सच्या नावाखाली ५,६०,००० रुपयांची मागणी केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसात धाव घेतली. सांगवी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक नांदेडकर पुढील तपास करत आहेत.

## बावधनच्या उद्योजकाला फॉरेक्स ट्रेडिंगच्या नावाखाली तब्बल ८८ लाखांचा चुना! सायबर गुन्हेगारांचे मोठे रॅकेट उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बावधन :** फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैशांची गुंतवणूक केल्यास ३५ ते ४० टक्के पेक्षा जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून बावधन येथील एका मोठ्या उद्योजकाला तब्बल ८८ लाख १९ हजार रुपयांना गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी हिंजवडी/सायबर पोलिसांनी एका मोठ्या आंतरराष्ट्रीय सायबर टोळीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

४० टक्के नफ्याचे आमिष आणि बनावट वेबसाईट फिर्यादी अभिजित प्रकाश कुलकर्णी (वय ४८, रा. विवाह हॉलमार्क, बावधन) यांना 'दिव्या अग्रवाल–शर्मा' नावाच्या महिलेने आणि तिच्या साथीदारांनी टेलिग्राम अकाउंट (intragloballimited03) वरून संपर्क साधला. आरोपींनी फिर्यादीला https://www.intragloballimited.com या बनावट वेबसाईटची लिंक पाठवून फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवण्यास भाग पाडले.

२० पेक्षा जास्त बँक खात्यांचा वापर करून कोट्यवधींची फसवणूक सुरुवातीला नफा झाल्याचे भासवून आरोपींनी फिर्यादीचा विश्वास जिंकला. त्यानंतर नफ्याची रक्कम खात्यातून काढायची असल्यास 'टॅक्स' भरावा लागेल असे सांगून बंधन बँक, अ‍ॅक्सिस बँक, बँक ऑफ बडोदा, आयसीआयसीआय बँक, येस बँक, पंजाब अँड सिंध बँक अशा तब्बल २० पेक्षा जास्त वेगवेगळ्या बँक खात्यांवर ८८,१९,००० रुपये भरायला लावले. पैसे भरूनही परतावा न मिळाल्याने कुलकर्णी यांनी तक्रार दिली. सायबर पोलिसांनी या टोळीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोनि गायकवाड या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

## ५० कोटींच्या खंडणी प्रकरण: गोदामावर गोळीबारापूर्वीच आखला होता कट; बिश्नोई गँगच्या पंटरने कर्मचारी बनून केली रेकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** फुरसुंगीतील लोखंड व्यावसायिकाच्या गोडाऊनवर ५० कोटींच्या खंडणीसाठी झालेल्या गोळीबार प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील ओळख पटलेला एक आरोपी हा कुख्यात लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे, संबंधित आरोपी यापूर्वी परिसरातील एका कंपनीत कामगार म्हणून कार्यरत होता.

पोलिस तपासानुसार, कंपनीत काम करत असताना आरोपीने व्यावसायिकाच्या गोडाऊनची रेकी केली होती. गोडाऊनची रचना, सुरक्षा व्यवस्था आणि परिसराची सविस्तर माहिती त्याने गोळा करून ती बिश्नोई टोळीपर्यंत पोहोचवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

काही दिवसांपूर्वी फुरसुंगी औद्योगिक परिसरातील एका लोखंड व्यावसायिकाकडे ५० कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. त्यानंतर गोडाऊनच्या मुख्य प्रवेशद्वारावर दुचाकीवरून आलेल्या अज्ञातांनी गोळीबार करून परिसरात दहशत निर्माण केली होती. तपासादरम्यान पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले असून, गोळीबारासाठी वापरण्यात आलेली दुचाकीही जप्त करण्यात आली आहे. मात्र, अद्याप या प्रकरणात कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांची १०० हून अधिक अधिकारी–कर्मचाऱ्यांची पथके आरोपींच्या शोधासाठी विविध ठिकाणी छापेमारी करत आहेत. तपासात असेही उघड झाले आहे की, गोळीबार केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळापासून काही अंतरावर मोटरसायकल सोडून दिली. त्यानंतर त्यांनी रिक्षाच्या साहाय्याने पलायन केले. एका रिक्षेतून काही अंतर पार केल्यानंतर त्यांनी दुसरी रिक्षा पकडून पुढील मार्गाने फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.

तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तपासाच्या आधारे पोलिसांनी एका आरोपीची ओळख निश्चित केली आहे. मात्र, तो अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. दरम्यान, या प्रकरणाबाबत वरिष्ठ पोलिस अधिकारी अधिकृतपणे भाष्य करण्यास टाळाटाळ करत असून, आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शॉर्टकट बेततोय जीवावर! पुणे रेल्वे विभागातील अपघातांत दीड वर्षात ५२३ जणांचा रुळ ओलांडताना गेला जीव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे रेल्वे विभागात गेल्या दीड वर्षात रेल्वे रूळ ओलांडताना झालेल्या अपघातांमध्ये ५२३ जणांचा मृत्यू झाला असून, ८७ जण जखमी झाले आहेत. प्रवाशांकडून 'शॉर्ट कट' म्हणून रेल्वे रूळ ओलांडण्याची धोकादायक प्रवृत्ती वाढत असल्याने ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

पुणे रेल्वे विभागातून दक्षिण व उत्तर भारतात जाणाऱ्या गाड्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे प्रवाशांची कायम गर्दी असते. काही प्रवाशांकडून गाडी पकडण्यासाठी 'शॉर्ट कट' मार्गाचा अवलंब केला जातो. अशा वेळी एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जाण्यासाठी थेट रूळ ओलांडून जातात. तितक्यात गाडी आल्यास जीवाला मुकावे लागते. प्रवाशांनी रेल्वे रूळ ओलांडू नये; म्हणून रेल्वे पोलिसांकडून अनेक उपाययोजना केल्या आहेत; परंतु प्रवाशांच्या चुकीमुळे रेल्वेच्या अपघातात बळी पडतात. रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी खबरदारी घेतली जाते. तशा सूचनाही वारंवार केल्या जातात. मात्र, प्रवासी त्याकडे दुर्लक्ष करून सर्रास नियम पायदळी तुडवतात. परिणामी अपघाताच्या घटना घडत आहेत. पुणे, दौंड आणि मिरज या प्रमुख स्थानक परिसरात अशा घटना जास्त असून, त्या ठिकाणी उपाययोजना करण्यावर भर दिला जात आहे. प्रवासादरम्यान अनेकजण मोबाइल आणि हेडफोनमध्ये गुंतलेले असतात. त्यामुळे आजूबाजूची जाणीव राहत नाही. रूळ ओलांडताना समोरून किंवा मागून येणाऱ्या रेल्वेचा आवाजही ऐकू न आल्याने अपघात होतात. कानात हेडफोन किंवा ब्लूटूथ असताना रेल्वे परिसरात वावरणे अत्यंत धोकादायक ठरत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रवाशांनी रूळ ओलांडताना हेडफोनचा वापर टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे प्रशासन आणि रेल्वे पोलिसांकडून जनजागृती मोहीम राबविली जाते. अनेक ठिकाणी रूळ ओलांडणे टाळण्यासाठी तारेचे कुंपण उभारण्यात आले आहे; तसेच नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईही केली जाते. प्रवाशांनी जीव धोक्यात घालून शॉर्टकट मार्गाचा अवलंब करू नये. सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे.

# कर्करोग रुग्णालयाच्या कामाला तातडीने गती देण्यात येईल : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते आळंदीत पेटसिटी युनिटचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :**

आळंदी / प्रतिनिधी : कर्करोगाची दिवसें दिवस वाढती रूग्णसंख्या विचारात घेता या रोगाचे अचूक निदान आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्यास प्राण वाचण्यास मदत होते. रुग्णांना जवळच्या रुग्णालयात माफक, अचूक निदान तसेच अत्याधुनिक उपचार उपलब्ध होईल यादृष्टीने राज्य शासन प्रयत्नशील आहे, पुणे विभागातील कर्करोग रुग्णालयाच्या कामाला तातडीने गती देण्यात येईल, असे आश्वासन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

आळंदी येथील इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युट येथे पेटसिटी युनिटच्या लोकार्पण सोहळ्या प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार दिलीप वळसे-पाटील, बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. नितीन देवमाने, आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युटचे विश्वस्त डॉ. संजय देशमुख, डॉ नितीन गोसावी, जिल्हा परिषद सदस्यता विनया मुंगसे, स्थानिक लोकप्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, देशात कर्करोग रुग्नांचे तसेच रोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत असून त्याच्या विरुध्द लढण्यासाठी अचूक निदान आणि योग्य प्रकारे उपचार महत्वाचे आहे. उपचार उशिरा सुरु झाल्यास रुग्णांचा वेळ आणि खर्चात वाढ होते; याच बाबीचा विचार करुन केंद्र आणि राज्य शासनाच्या योजने मध्ये कर्करोगावरील उपचाराचा समावेश केलेला आहे.

राज्यशासन कर्करोगा विरुद्ध लढ्यासाठी केवळ उपचारावर भर न देता प्रतिबंध आणि अचूक निदानावर विशेष लक्ष देत आहे. त्याचाच भाग म्हणून राज्यस्तरीय कर्करोग उपचार व्यवस्था सुरु करण्यात आली आहे. महाकेअर फाउंडेशनच्या माध्यमातून कर्करोग उपचार व्यवस्था उभारण्यात येणार आहे. तसेच नागपूर येथे हायएनर्जी मेडिकल सायक्लोस्टोन प्रकल्प स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, त्यामुळे कर्करोग उपचार, निदान आणि संशोधनाला चालना मिळणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रुग्णालयाला भेट दिली असता रुग्णालय व्यवस्थापनाने अत्याधुनिक पेटसिटी मशीन करिता निधीची मागणी केली असता, कर्करोगाचे गांभीर्य आणि रुग्णांची गैरसोय विचारात घेता त्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून या मशीन करिता २७ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. या पेटस्कॅन मशीनच्या माध्यमातून कर्करोगाचे अचूक निदान होण्यासह डॉक्टरांना आधुनिक उपचार पद्धतीचा अवलंब करता येणार आहे. सर्वसामान्य गरजू रुग्णांना या अत्याधुनिक आरोग्य सुविधांचा लाभ होणार असून त्यांचे प्राण वाचणार आहेत. इंद्रायणी रुग्णालयाने व्यवसायिक दृष्टिकोन न ठेवता नेहमीच रुग्णांना माफक दरात आरोग्य सेवेला प्राधान्य दिले आहे. हे कार्य सामजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे, यापुढेही अशीच निरंतर रुग्णसेवा होत राहील, या कार्याला राज्य शासना कडून सहकार्य करण्यात येईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.



वळसे पाटील म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नामुळे पेटस्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या कर्करोग रुग्णालयात आर्थिकदृष्टया दुर्बल, सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपचार मिळत आहे, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी राहण्याची व्यवस्थेची सुविधा आवश्यक आहे, राज्य शासना सोबत सेवाभावी संस्थानी मिळून हे काम करावे, आज दिवसेंदिवस कर्करोगाचे प्रमाणात वाढ होत असून कर्करोगा विरुद्ध लढण्याची आपली सामाजिक जबाबदारी आहे. येत्या काळात जिल्ह्यात कर्करोगा विरुद्ध लढण्यासाठी सुसज्ज कर्करोग रुग्णालयांची उभारणी होणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचीही गरज आहे, असे श्री. वळसे पाटील म्हणाले.

आमदार बाबाजी काळे म्हणाले, सामजिक बांधिलकी जपत आळंदी येथील इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्युटच्या माध्यमातून आळंदी, खेड परिसरासह विविध भागातील रुग्णांना कर्करोगावर उपचार होत आहे, यापूढेही रुग्णसेवेच्या माध्यमातून कर्करोगमुक्त परिसर होण्यास मदत होईल, असेही काळे म्हणाले.

या वेळी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, डॉ. देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले. श्रीमती पवार यांनी कर्करोग रुग्णालयाची पाहणी करुन येथील सर्व सुविधांची माहिती घेतली.

## ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा कर्मचाऱ्याला मारहाण कॉलनीत पाणी न सोडल्याच्या कारणावरून वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठ्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ज्ञानेश्वर मेदनकर (वय ४५, रा. मेदनकरवाडी, ता. खेड, जि. पुणे) हे ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठ्याचे काम करत आहेत. २४ जून रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास शिर्के यांच्या विटभट्टीजवळील रस्त्यावर ते ग्रामपंचायतीचे पाणी सोडण्याचे काम करत असताना हा प्रकार घडला.

या प्रकरणात रेखा सुनील बोरकर आणि शहाजी पवार (दोघेही रा. बापदेव वस्ती, मेदनकरवाडी, ता. खेड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॉलनीत पाणी सोडले नसल्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीला दुचाकीवरून खाली ओढले, शिवीगाळ केली आणि मारहाण केली, असा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण करून त्यांना काम करण्यापासून परावृत्त केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास चाकण दक्षिण पोलीस करत असून पोलीस हवालदार बांगर हे तपास अधिकारी आहेत.

## गुजरातहून आणलेला २२.९१ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त; नऱ्हे पोलिसांची धडक कारवाई, दोघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** नऱ्हे पोलिसांनी गुटखा माफियांविरोधात मोठी कारवाई करत गुजरात येथून विक्रीसाठी आणलेला तब्बल २२ लाख ९१ हजार ५३४ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नऱ्हे पोलिस ठाण्याचे तपास पथक परिसरात गस्त घालत असताना पोलिस अंमलदार देवा चव्हाण यांना एका ट्रॅव्हल्स बसमधून प्रतिबंधित गुटखा वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक वर्षा देशमुख, पोलिस निरीक्षक (गुन्हे) ईश्वर चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे आणि त्यांच्या पथकाने नवले पुलाखाली सापळा रचून संबंधित बसची तपासणी केली. तपासणीदरम्यान चालक हबास मुबारक खान (वय ३४, रा. बाडमेर, राजस्थान) याच्या ताब्यातील बसमधून विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू, आरएमडी पान मसाला, तुळशी तंबाखू आणि गोवा गुटखा असा ५ लाख ९० हजार ८०० रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. तसेच माल स्वीकारण्यासाठी आलेल्या सोहेल अस्लम मुलाणी (वय २२, रा. गंजपेठ, पुणे) याला ताब्यात घेण्यात आले. पुढील चौकशीत केदारीनगर येथील एका गोदामावर छापा टाकण्यात आला. तेथून त्याच प्रकारचा १७ लाख ७३४ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. आरोपींनी हा माल गुजरातमधील अहमदाबाद येथून आणल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत एकूण २२ लाख ९१ हजार ५३४ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नऱ्हे पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता, सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने अधिनियम तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे करीत आहेत.

## धामणीच्या सामूहिक पाईपलाईन प्रश्नाला गती; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर महावितरणकडून पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील सामूहिक पाईपलाईन व वीजप्रश्नासाठी ग्रामस्थांनी केलेल्या उपोषणाची दखल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून, संबंधित अधिकाऱ्यांना जास्त लांबीच्या योजनेसाठी सोलर जोडणीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



या सूचनांनुसार शनिवारी महावितरणचे अधिकारी डिंबा उजवा कालव्यालगतच्या परिसरात दाखल झाले. त्यांनी पहाडदरा लाईनवरील जागेची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तांत्रिक बाबींचा आढावा घेतला. तसेच योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात काही आवश्यक सूचना संबंधितांना दिल्या.

यावेळी सोलर विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. त्यांनी लवकरात लवकर सोलर पॅनेल उभारणीचे काम पूर्ण करून त्यानंतर आवश्यक तपासणी पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन ग्रामस्थांना दिले. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या सामूहिक पाईपलाईन योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पाहणीप्रसंगी महावितरणचे अधिकारी आर. के. गवारी, एन. सी. बासरकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजित चव्हाण, उपतालुकाप्रमुख किरण ढोबळे, उपसरपंच अक्षयराजे विधाटे, माजी सरपंच सागर जाधव, माजी सरपंच अंकुशराव भुमकर, अमोल जाधव, मच्छिंद्र अमाप, राहुल करंजखेले, दत्ता गवंडी, संजय बढेकर, वामन जाधव, निलेश करंजखेले, आनंदराव जाधव, नामदेव भगत, प्रशांत भूमकर, अजित भूमकर, रुपेश विधाटे, रोहित भुमकर, बाळासाहेब बोऱ्हाडे, धनेश बोऱ्हाडे, पांडुरंग जाधव, बाळासाहेब विधाटे, विकास रोडे, प्रकाश विधाटे, सोलर विभागाचे श्री. पवार तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

ग्रामस्थांनी प्रशासनाने दिलेले आश्वासन वेळेत पूर्ण करून सामूहिक पाईपलाईन योजनेला लवकरात लवकर वीजपुरवठा सुरू करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## म्हाडाच्या रावेत योजनेतील ७१२ सदनिकांसाठी सोडत; अल्प उत्पन्न गटाला मोठा प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** म्हाडाच्या रावेत येथील गृहनिर्माण योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या ७१२ सदनिकांच्या वितरणासाठी ऑनलाइन सोडत बुधवारी (दि. २५) यशस्वीरीत्या पार पडली. गृहनिर्माण भवन येथे आयोजित कार्यक्रमात मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते सोडत काढण्यात आली.

रावेत येथील सर्व्हे क्रमांक १२६ व १२७/२ मधील या योजनेत अल्प उत्पन्न गटासाठी २४ तर मध्यम उत्पन्न गटासाठी ६८८ अशा एकूण ७१२ सदनिकांचा समावेश आहे. एप्रिलमध्ये या सदनिकांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची ऑनलाइन सोडत पार पडली. या वेळी मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे, उपमुख्य अधिकारी राहुल शिळीमकर, मिळकत व्यवस्थापक रामचंद्र भोसले, रोपेश जगमापे यांच्यासह मंडळाचे अधिकारी, कर्मचारी आणि अर्जदार उपस्थित होते. अल्प उत्पन्न गटातील २४ सदनिकांसाठी तब्बल ४३८ अर्ज प्राप्त झाले असून, मध्यम उत्पन्न गटातील ६८८ सदनिकांसाठी ३०४ अर्ज दाखल झाले. मध्यम उत्पन्न गटातील सर्व पात्र अर्जदारांना सदनिका मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, शिल्लक राहिलेल्या सदनिकांसाठी लवकरच दुसरी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार असून आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यानंतर ऑगस्ट-जून २०२७ पर्यंत ताबा देण्याचे नियोजन असल्याची माहिती आढळराव यांनी दिली. सदनिकांसाठी मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता परवडणाऱ्या घरांच्या योजनांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## 'धरण उशाला, कोरड घशाला'; हाडशीत भीषण पाणीटंचाई, ग्रामस्थांचा पाटबंधारे विभागावर ठपका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुळशी तालुक्यातील हाडशी गावात गेल्या महिनाभरापासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. गावालगत पाटबंधारे विभागाचा तलाव असतानाही पाण्याचे योग्य नियोजन न झाल्याने तलावातील साठा मृत पातळीखाली गेला असून, तलाव पूर्णपणे कोरडा पडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

हाडशी गावातील पिण्याच्या पाण्याची मुख्य विहीरही आटल्याने सुमारे १६० कुटुंबांतील ९०० नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. वळकी नदीत सोडण्यात आलेल्या पाण्याच्या आवर्तनाचे नियोजन चुकीच्या पद्धतीने झाल्याने ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

गावातील नागरिकांना केवळ पिण्याच्या पाण्याचाच नव्हे, तर जनावरे आणि शेती पिकांसाठीही पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. उसासह अन्य पिके धोक्यात आली असून, आता गावासाठी टँकरची मागणी करण्याची वेळ आल्याचे सरपंच अनिता लोयरे यांनी सांगितले.

माजी सभापती रवींद्र कंधारे यांनी गावाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. मुळशी प्रादेशिक टप्पा-२ पाणीपुरवठा योजना वेळेत कार्यान्वित झाली असती तर आज ही वेळ आली नसती, असे त्यांनी सांगितले. तर माजी सरपंच काळुराम आखाडे यांनी धरण उशाला आणि कोरड घशाला अशी भावना व्यक्त करत पुढील वर्षी पाण्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी केली.

दरम्यान, या संदर्भात पाटबंधारे विभागाचे अभियंता किशोर चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांनी नंतर संपर्क करतो, असा संदेश दिला. विशेष म्हणजे, गेल्या अनेक दशकांतील ही पहिलीच वेळ असून, याच कालावधीत हाडशी तलावाची पाण्याची पातळी इतकी खालावल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## भीमा नदीपात्र कोरडे; वढू येथील पाणीपुरवठा बंद, वाघोलीची पाण्याविना दयनीय अवस्था

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने आणि भीमा नदीचे पात्र कोरडे पडल्याने वढू येथील पाणीपुरवठा यंत्रणा बंद पडली आहे. त्यामुळे वाघोलीकरांवर पाणीटंचाईचे मोठे संकट ओढवले असून, अनेक भागांमध्ये नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. दैनंदिन जीवन विस्कळीत झाल्याने पुणे महापालिकेने तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



वाघोलीला वढू येथील धरणातून ग्रामपंचायतीच्या काळात उभारण्यात आलेल्या जलवाहिनीद्वारे दररोज सुमारे पाच एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. मात्र भीमा नदीचे पात्र कोरडे पडल्याने धरणातील पाणीसाठ्यावर परिणाम झाला असून, पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी अनेक भागांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. वाघोलीचा पुणे महापालिकेत समावेश होऊन तीन वर्षांहून अधिक कालावधी लोटला असला तरी वाघोलीकरांकडून मोठ्या स्वरूपात कर वसूल करूनही अपेक्षित नागरी सुविधा अद्याप उपलब्ध झालेल्या नाहीत.

त्यातच जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक रामदास दाभाडे यांनी केली आहे. नागरिकांमधूनही महापालिकेने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

महापालिकेकडून हजारो कोटी रुपयांचा कर वसूल केला जातो. मात्र त्यानुसार नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा मिळत नाहीत. वाघोलीकरांची गैरसोय लक्षात घेऊन तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा.

## सारांश वृत्त

### '१०० कोटींच्या काँग्रेसचा मोठा निर्णय; SC विभागप्रमुख राजेंद्र पाल गौतम यांची UP AICC प्रभारी म्हणून नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस पक्षाने उत्तर प्रदेशसाठी मोठा संघटनात्मक बदल करत राजेंद्र पाल गौतम यांची AICC प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. ते सध्या काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे प्रमुख आहेत. हा निर्णय उत्तर प्रदेशमध्ये पक्ष मजबूत करण्याच्या रणनीतीचा भाग मानला जात असून, दलित आणि मागास मतदारांपर्यंत पोहोच वाढवण्यावर काँग्रेसचा भर असल्याचे दिसते.

### जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची १–३ जुलै दरम्यान भारत दौऱ्यावर; दिल्लीमध्ये भारत–जपान वार्षिक शिखर परिषद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची या १ ते ३ जुलै दरम्यान भारत दौऱ्यावर येणार आहेत. या काळात त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत १६वी भारत–जपान वार्षिक शिखर परिषद सहभागी होणार आहेत, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने (MEA) दिली आहे. या बैठकीत दोन्ही देशांतील व्यापार, गुंतवणूक, संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञान आणि इंडो–पॅसिफिक क्षेत्रातील रणनीतिक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. हा दौरा दोन्ही देशांमधील स्ट्रॅटेजिक भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

### बीडच्या तहसीलदारावर माळेगाव पोलिसात ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सांगवी :** जळगाव सुपे (ता. बारामती) येथील एका व्हॉट्सॲप ग्रुपवर ग्रामपंचायत आरक्षणासंदर्भात चालू असलेल्या चर्चेदरम्यान अनुसूचित जातीतील व्यक्तीला जातीय हेतूने अपमानित केल्याप्रकरणी तहसीलदारासह आणखी एका व्यक्तीवर माळेगाव पोलिस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारतातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनची दिल्ली–जींद मार्गावर ट्रायल; हरित तंत्रज्ञानाच्या दाव्यांवर उत्साह आणि प्रश्न दोन्ही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : भारताच्या रेल्वे क्षेत्रात हरित ऊर्जेच्या दिशेने मोठे पाऊल मानले जात असलेल्या देशातील पहिल्या हायड्रोजन–चालित ट्रेनचे दिल्ली–सोनीपत–जींद मार्गावर ट्रायल रन करण्यात आले आहे. ही चाचणी सेवा लाँचिंगपूर्वीची महत्त्वाची पायरी मानली जात असून, भारतीय रेल्वेच्या भविष्यातील 'ग्रीन मोबिलिटी' धोरणाचा भाग म्हणून याकडे पाहिले जात आहे.

इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, ही ट्रेन पूर्णपणे हायड्रोजन इंधनावर चालणारी असून, डिझेल इंजिनला पर्याय म्हणून विकसित करण्यात आली आहे. या तंत्रज्ञानामुळे कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा सरकारचा दावा आहे. विशेषतः मध्यम अंतरावरील प्रवासी गाड्यांमध्ये हे तंत्रज्ञान वापरल्यास पर्यावरणपूरक रेल्वे वाहतुकीकडे मोठी झेप मानली जात आहे.

ट्रायल रनदरम्यान ट्रेनने दिल्ली–सोनीपत–जींद मार्गावर सुरक्षितपणे प्रवास केला आणि विविध तांत्रिक चाचण्या घेण्यात आल्या. वेग, इंधन कार्यक्षमता, सुरक्षितता प्रणाली आणि हायड्रोजन स्टोरेज यंत्रणा यांची तपासणी या चाचणीचा भाग होती.

**सरकारचा दावा: हरित क्रांतीची नवी दिशा**

रेल्वे मंत्रालयाच्या



दाव्यानुसार, हायड्रोजन ट्रेनमुळे भविष्यात डिझेलवरील अवलंबित्व कमी होईल आणि भारताच्या कार्बन उत्सर्जन कपात लक्ष्यांना गती मिळेल. ही ट्रेन नेट झिरो एमिशन दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले जात आहे. भारताला ऊर्जा स्वावलंबनाकडे नेण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याचा सरकारचा दावा आहे.

**मात्र प्रश्नही कायम**

या उत्साहाच्या पार्श्वभूमीवर तज्ज्ञांकडून काही गंभीर प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. हायड्रोजन ट्रेनचे तंत्रज्ञान अद्याप जगभरात प्रारंभिक टप्प्यात आहे. सुरक्षित साठवण, उच्च दाबातील हायड्रोजन हाताळणी, आणि अपघाताच्या परिस्थितीत सुरक्षा व्यवस्था याबाबत अद्याप पूर्ण स्पष्टता नाही, असे काही रेल्वे तज्ज्ञांचे मत आहे.

याशिवाय, या प्रकल्पाचा खर्च अत्यंत जास्त असल्याचेही मानले जाते. हायड्रोजन उत्पादन, साठवण आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. त्यामुळे ही तंत्रज्ञान–प्रयोगशाळा पातळीवरील यशस्वी चाचणी आहे, पण मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी अजून आव्हानात्मक आहे, असे विश्लेषकांचे मत आहे.

**ऊर्जा स्रोतावरही चर्चा**

हायड्रोजन ग्रीन मानले जाते, मात्र तो तयार करण्याची प्रक्रिया (विशेषतः ग्रे किंवा ब्लू हायड्रोजन) अजूनही अनेकदा जीवाश्म इंधनांवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्यक्षात किती हरित लाभ मिळेल, हा प्रश्न अद्याप चर्चेत आहे.

**भारतीय रेल्वेचा मोठा प्रयोग**

भारतीय रेल्वेने मागील काही वर्षांत इलेक्ट्रिफिकेशन आणि हरित तंत्रज्ञानावर भर दिला आहे. त्याच धोरणाचा पुढचा टप्पा म्हणून हायड्रोजन ट्रेन प्रकल्प पाहिला जात आहे. भविष्यात काही निवडक मार्गांवर अशा ट्रेन सुरू करण्याचा विचार असल्याचे संकेत आहेत.

# मोदी सरकारच्या मंत्र्यांनाच स्वतःच्या मंत्रालयाच्या योजनेतून ९९.६० लाखांचे अनुदान; हितसंबंधांच्या संघर्षावर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : केंद्रातील मोदी सरकारमधील कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री भागीरथ चौधरी यांना त्यांच्या काकडी शेती प्रकल्पासाठी ९९.६० लाख रुपयांचे सरकारी अनुदान मिळाल्याची बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, हे अनुदान त्यांच्याच मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय बागायती मंडळाच्या (National Horticulture Board) योजनेतून मंजूर झाल्याचे म्हटले आहे.

वृत्तानुसार, भागीरथ चौधरी हे कृषी राज्यमंत्री असल्याने राष्ट्रीय बागायती मंडळाचे पदसिद्ध (ex-officio) उपाध्यक्ष आहेत. त्याच मंडळाने त्यांच्या राजस्थानातील काकडी शेती प्रकल्पाला सुमारे १.९९ कोटी रुपयांच्या प्रकल्पासाठी ९९.६० लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले. या योजनेत पात्र प्रकल्पांना एकूण खर्चाच्या ५० टक्क्यांपर्यंत, कमाल एक कोटी रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद आहे.

या प्रकरणानंतर हितसंबंधांचा संघर्ष (Conflict of Interest) आणि सरकारी योजनांच्या



पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. विरोधकांनी यावर टीका करत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

मात्र, मंत्र्यांच्या कार्यालयाने कोणताही नियमभंग झालेला नसल्याचा दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज इतर लाभार्थ्यांप्रमाणेच नियमित प्रक्रियेनुसार करण्यात आला होता आणि अनुदानाचा अंतिम निर्णय स्वतंत्र प्रकल्प मंजुरी समितीने घेतला. या प्रक्रियेत मंत्र्यांनी स्वतः कोणतीही भूमिका बजावलेली नाही, असेही स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

या प्रकरणामुळे सत्ताधाऱ्यांनी स्वतःच्या मंत्रालयाशी संबंधित योजनांचा लाभ घेणे नैतिकदृष्ट्या योग्य आहे का, तसेच अशा परिस्थितीत हितसंबंधांच्या संघर्षाचे व्यवस्थापन कसे केले जाते, यावर व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

# Apple ची दरवाढ आणि AI चिप टंचाईमुळे आशियाई बाजारात मोठी घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : आशियाई शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली असून, तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढते खर्च आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) संबंधित चिप्सच्या टंचाईमुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**Apple कडून किंमती वाढ**

Apple ने काही MacBook आणि iPad मॉडेल्सच्या किमती जवळपास २०% पर्यंत वाढवल्या आहेत. उत्पादन खर्च वाढल्यामुळे ही दरवाढ करण्यात आली असून, यामुळे ग्राहक मागणी कमी होण्याची भीती व्यक्त केली जात



आहे.

**AI मुळे चिप्सची जागतिक टंचाई**

AI डेटा सेंटर्ससाठी लागणाऱ्या सेमीकंडक्टर आणि मेमरी चिप्सची मागणी प्रचंड वाढली आहे. त्यामुळे पुरवठा साखळीवर ताण येऊन पारंपरिक इलेक्ट्रॉनिक्स उद्योगासाठी चिप्सची उपलब्धता कमी झाली आहे.

**आशियाई बाजारांवर परिणाम**

दक्षिण कोरिया आणि जपानमधील तंत्रज्ञान शेअर्समध्ये मोठी घसरण झाली आहे. गुंतवणूकदारांना नफा कमी होण्याची आणि खर्च वाढण्याची चिंता आहे.

**AI बूमचा उलट परिणाम**

AI क्षेत्राच्या जलद वाढीमुळे उत्पादन क्षमता त्या दिशेने वळली आहे. परिणामी इतर इलेक्ट्रॉनिक उत्पादनांसाठी घटकांची कमतरता निर्माण होत आहे.

# अफगाणिस्तानात ६.२ रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप; भारत, पाकिस्तानसह ७ देशांना बसले तीव्र धक्के

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हिंदुकुश (अफगाणिस्तान) :** अफगाणिस्तानच्या हिंदूकुश पर्वतीय क्षेत्रात शनिवारी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी ६.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा अत्यंत शक्तिशाली भूकंप झाला आहे. या भूकंपाचे केंद्र जमिनीच्या खोल भागात असले, तरी त्याचे तीव्र धक्के भारत, पाकिस्तान आणि चीनसह तब्बल सात देशांमध्ये जाणवले आहेत. यामुळे दक्षिण आशियातील लाखो नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे आणि घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक ठिकाणी लोक घराबाहेर धावत आले.

**२१५ किमी खोल केंद्र; ७ देशांमध्ये थरथराट**

'नॅशनल जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया'ने दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपाचे केंद्र ईशान्य अफगाणिस्तानातील कालाफगान शहरापासून सुमारे ८१ किलोमीटर दूर, ३६.४४२ओ उत्तर अक्षांश आणि ७०.६७२ओ पूर्व रेखांशावर होते. या भूकंपाची खोली जमिनीच्या पृष्ठभागापासून तब्बल २१५ किलोमीटर खोल होती. केंद्र अतिशय खोलवर असल्याने या भूकंपाचे धक्के खूप मोठ्या क्षेत्रावर पसरले. अफगाणिस्तान व्यतिरिक्त भारत (उत्तर भारत), पाकिस्तान, चीन, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, किर्गिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांना भूकंपाचे तीव्र धक्के बसले.

**दिल्ली-एनसीआर आणि उत्तर भारतात काही सेकंद थरथराट**

भारतात राजधानी दिल्लीसह राष्ट्रीय राजधानी क्षेत्र , जम्मू-काश्मीर, पंजाब आणि हिमाचल प्रदेशच्या काही भागांमध्ये काही सेकंदांपर्यंत भूकंपाचे स्पष्ट धक्के जाणवले. यामुळे दैनंदिन कामात व्यस्त असलेले नागरिक भीतीपोटी घराबाहेर आणि रस्त्यावर आले. पाकिस्तानात विशेषतः खैबर पख्तुनख्वा प्रांत आणि पेशावर सारख्या सीमावर्ती शहरांमध्ये खिडक्यांच्या काचा वाजल्याने नागरिक सुरक्षेसाठी मोकळ्या मैदानांकडे धावले.

**मोठ्या नुकसानीची शक्यता कमी; तज्ज्ञांचा अंदाज**

भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते, जेव्हा भूकंपाचे केंद्र जमिनीच्या खूप आत (खोलवर) असते, तेव्हा त्याचे धक्के अतिशय विस्तृत प्रदेशात जाणवतात; मात्र, जमिनीच्या वरच्या भागातील इमारती आणि वित्तहानीचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी राहण्याची शक्यता असते.

# देशभरात सुमारे सहा कोटी मतदारांची नावे वगळली; आयोगाकडून मतदारयाद्या त्रुटीमुक्त करण्याचे काम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मतदारयाद्यांच्या विशेष पुनरावलोकन मोहिमेला (एसआयआर) प्रारंभ होऊन एक वर्ष पूर्ण झाले. या कालावधीत निवडणूक आयोगाने सदर उपक्रमाद्वारे देशभरात सुमारे सहा कोटी नावे मतदार यादीतून वगळली आहेत. या प्रक्रियेमुळे विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यात तीव्र वाद निर्माण झाला असला, तरी आयोगाने मतदारयादीतील त्रुटी दूर करण्याची मोहीम १९ राज्ये, केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू ठेवली आहे. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर ही मोहीम सुरू झाली होती. त्यानंतर ६५ लाख नावे वगळण्यात आली. कागदपत्रांच्या नावाखाली नागरिकांना मतदानापासून वंचित ठेवल्याचा आरोप विरोधकांनी केला. मात्र, एसआयआरची घटनात्मक वैधता सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली. नववीच्या पुस्तकात समावेश एसआयआरवरील मजकुराचा समावेश एनसीईआरटीच्या नववीच्या समाजशास्त्र पुस्तकात केला आहे. पात्र मतदार वगळला जाणार नाही. अपात्र व्यक्तीचा समावेश होणार नाही, यासाठी ही प्रक्रिया असल्याचे नमूद आहे.

६६.८८ लाख मृत मतदारांची नावे हटविण्यात आली. ६३.१६ लाख नावे पडताळणीनंतर वगळली. १०.२ टक्क्यांनी मतदार घटले. १२ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ५०.९९ कोटी मतदारांपैकी ५.१८ कोटी नावे वगळली गेली. **पहिला टप्पा :** जून ते सप्टेंबर २०२५ – बिहारमधील सुमारे ४७ लाख दुबार किंवा मृत मतदारांची नावे वगळली. **दुसरा टप्पा :** नोव्हेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ – (१२ राज्ये/केंद्रशासित प्रदेश) – उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालसह ५१ कोटी मतदारांच्या नावांची तपासणी. **तिसरा टप्पा :** आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, दिल्लीसह १६ राज्ये, ३ केंद्रशासित प्रदेशांत १४ मेपासून सुरू.

# पहलगाम हल्ल्यातील शहीद जवानांची नावं सरकारने लपवली, काँग्रेसचा गंभीर आरोप; 'तो' व्हिडिओ दाखवला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांकडून पहलगाम येथे हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. सरकारने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तमध्ये घुसून दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट केले होते. आता सरकारने हल्लात शहीद झालेल्या सहा जवानांची नावे लपवून ठेवल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे.

काँग्रेस नेते पवन खेडा यांनी ट्विट करत म्हटले आहे की, 'जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारतीय सैन्याचे ६ जवान शहीद झाले होते. या ६ वीर जवानांची नावे आणि त्यांचे सर्वोच्च बलिदान भाजप सरकारने तब्बल एक वर्ष देशापासून लपवून ठेवले.' 'नेहमी राष्ट्रवादाच्या गप्पा मारणाऱ्या सरकारने या खऱ्या हिरोंचा (शहीद जवानांचा) योग्य तो सन्मान नाकारला असून, ही गोष्ट अत्यंत लाजीरवाणी आहे.', अशी टीका खेडा यांनी केली आहे.

**शहीद झालेले जवान**

पवन खेडा यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, मुख्यालय १० इन्फंट्री ब्रिगेडचे सुभेदार मेजर पवन कुमार, जम्मू आणि काश्मीर लाइट इन्फंट्रीचे रायफलमॅन सुनील कुमार (वीर चक्र), फील्ड रेजिमेंटचे लान्स नायक दिनेश कुमार, ८५१ लाइट रेजिमेंटचे एव्हिएशन टेक्निशियन मूड मुरलीनाईक, २३७ फील्ड वर्कशॉप कंपनीचे हवालदार सुनील कुमार सिंग, ३९ विंगचे सार्जंट सुरेंद्र कुमार (वायू पदक) हे भारताचे ते शूर सुपुत्र आहेत ज्यांनी पहलगामवरील हल्ल्यानंतर भारताचा सन्मान आणि आपल्या बहिणींचे सौभाग्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांचे बलिदान दिले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पहलगाम हल्ल्यानंतर संसदेत उत्तर देताना हल्ल्यामध्ये भारतीय सैनिकांची हानी झाली नाही, असे उत्तर दिले होते. त्यांचा तो व्हिडिओ पवन खेडा यांनी आपल्या ट्विटरवर शेअर करत म्हटले आहे की, दोनच शक्यता आहेत की, राजनाथ सिंह हे जेव्हा संसदेत बोलत होते तेव्हा त्यांना सैनिक शहीद झाले याची माहिती नव्हती.जर असे असेल तर गंभीर प्रश्न उपस्थित होतो की, ज्या मंत्रालयाचा कारभार त्यांच्याकडे आहे त्याच मंत्रालयाच्या संबंधीत घटनांची माहिती नाही. किंवा त्यांना सत्य माहीत होते मात्र त्यांनी दिशाभूल करण्याचा मार्ग निवडला.

# गाझा मुद्द्यावरून सोनिया गांधींचा मोदी सरकारवर घणाघात; भारताचे मौन समजण्यापलीकडचे, परराष्ट्र धोरणावर गंभीर प्रश्न


■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : गाझामधील सुरू असलेल्या मानवी संकटाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर अत्यंत तीव्र शब्दांत हल्ला चढवला आहे. एका लेखाद्वारे त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, गाझावरील भारताचे मौन समजण्यापलीकडचे आहे, असे म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे देशातील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, परराष्ट्र धोरण आणि मानवी हक्कांच्या मुद्द्यावर नवी चर्चा सुरू झाली आहे.

सोनिया गांधी यांनी आपल्या लेखात म्हटले की, भारताने ऐतिहासिकदृष्ट्या न्याय, शांतता, मानवी हक्क आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा पुरस्कार केला आहे. मात्र, गाझामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या नागरिकांच्या मृत्यू, विस्थापन आणि मानवी संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने अपेक्षित ठाम भूमिका घेतलेली दिसत नाही. त्यांच्या मते, भारताचे हे मौन देशाच्या पारंपरिक परराष्ट्र धोरणाशी विसंगत आहे.

त्यांनी पॅलेस्टिनी जनतेच्या स्वनिर्णयाच्या हक्काला भारताने पूर्वी सातत्याने पाठिंबा दिल्याची आठवण करून दिली. तसेच, इस्रायलशी संबंध मजबूत करणे आणि पॅलेस्टिनी जनतेच्या हक्कांबाबत स्पष्ट भूमिका घेणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. कोणत्याही एका भूमिकेचा अर्थ दुसऱ्या बाजूच्या मानवी हक्कांकडे दुर्लक्ष करणे असा होऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सोनिया गांधी यांनी



गाझामधील परिस्थितीला गंभीर मानवी संकट असे संबोधत, आंतरराष्ट्रीय समुदायाने तातडीने युद्धविरामासाठी प्रयत्न करावेत, नागरिकांचे संरक्षण करावे आणि मानवतावादी मदतीचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी केली. भारतानेही आपल्या नैतिक आणि राजनैतिक परंपरेनुसार अधिक सक्रिय भूमिका बजावावी, असे त्यांनी म्हटले.

दरम्यान, भाजपने काँग्रेसच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. भाजपच्या नेत्यांनी सोनिया गांधी यांच्या लेखामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. केंद्र सरकारने गाझासाठी मानवतावादी मदत पुरवली असून, भारत सातत्याने शांतता, संवाद आणि दहशतवादविरोधातील भूमिकेवर ठाम असल्याचे भाजपने सांगितले. तसेच, भारताचे परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हित लक्षात घेऊनच ठरवले जाते, असा दावा भाजपने केला.

गाझा संघर्ष सुरू झाल्यापासून भारताने अनेक वेळा नागरिकांच्या सुरक्षेची गरज अधोरेखित केली आहे. त्याचबरोबर, दहशतवादाचा निषेध आणि शांततापूर्ण तोडग्याला पाठिंबा अशी भूमिका देखील भारताने विविध आंतरराष्ट्रीय मंचांवर मांडली आहे. मात्र, या भूमिकेवरून विरोधकांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सोनिया गांधी यांच्या या लेखानंतर देशात परराष्ट्र धोरण, मानवी हक्क, आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताच्या जागतिक भूमिकेबाबत राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी संसदीय अधिवेशनातही हा मुद्दा गाजण्याची शक्यता असून, सरकार आणि विरोधकांमध्ये यावरून जोरदार संघर्ष पाहायला मिळू शकतो.